महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक – २२/३१६३२२५ दिनांक :- १३ एप्रिल, २०२६

प्रसिद्धिपत्रक

# १६ व्या म्हाडा लोकशाही दिनात १३ अर्जांवर सुनावणी

मुंबई, दि. १३ एप्रिल, २०२६ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवनात सोळावा लोकशाही दिन आयोजित करण्यात आला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात नागरिकांच्या एकूण १३ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली.

आजच्या या लोकशाही दिनामध्ये अनेक प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यात आला. अर्जदार श्रीमती अश्लेषा आंबेकर यांच्या आई श्रीमती सुनीला आंबेकर, गिरणी कामगार सोडतीत अपोलो मिल योजनेतील संकेत क्रमांक एकमध्ये यशस्वी अर्जदार ठरल्या. मात्र, कागदपत्रांच्या पडताळणी नंतर व अपोलो मिलतर्फे प्राप्त पत्राच्या आधारे श्रीमती सुनीला आंबेकर यांना अपात्र ठरविण्यात आले. सदर निर्णय प्रकरणी अर्जदार यांनी अपील केले असता, उपायुक्त, कामगार विभाग यांनी दि. २ फेब्रुवारी, २०२६ रोजी संबंधित अर्जदार यांना पात्र ठरविण्यात आले. दरम्यान, यशस्वी अर्जदार श्रीमती सुनीला आंबेकर यांचे दुर्दैवाने निधन झाले. पात्रता निश्चिती झाल्यामुळे सदर सदनिकेचा ताबा मुलगी या नात्याने वारस म्हणून मिळावा याकरिता लोकशाही दिनामध्ये अर्ज सदर केला. सदर अर्जावर सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित अर्जदार यांनी सादर केलेल्या वारसाहक्क प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित अधिकारी यांनी श्रीमती अश्लेषा आंबेकर यांना त्वरित सदनिकेचा ताबा देण्याचे निर्देश दिले. श्रीमती अश्लेषा आंबेकर यांना सदनिकेचे ताबा पत्र बुधवार दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी प्रदान करण्यात येणार आहे.

श्री. रामकृष्ण पाताडे हे कोकण मंडळाच्या सन २०२४ मधील सदनिका सोडतीत विरार-बोळींज गृहनिर्माण योजनेत यशस्वी अर्जदार ठरले. मात्र, बँकेकडून कर्ज मंजुरीस विलंब झाल्याने सदनिकेची विक्री किंमत भरण्यास उशीर झाला आणि त्यामुळे मंडळातर्फे नियमानुसार त्यांच्यावर रु. १,८३,०००/- इतकी व्याज आकारणी करण्यात आली. सदर व्याज माफ करण्याबाबत श्री. पाताडे यांनी आजच्या लोकशाही देण्यात अर्ज केला. सदर अर्जावर सुनावणी करताना श्री. संजीव जयस्वाल यांनी विशेष बाब म्हणून व मानवतेच्या दृष्टिकोनातून श्री. पाताडे यांचे व्याज माफ करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच, विरार-बोळींज गृहनिर्माण योजनेतील अशाच प्रकारच्या इतर प्रकरणांमध्येही समान न्याय व सुसंगतता राखण्यासाठी अशाच प्रकारची कार्यवाही करण्याचे निर्देशही श्री. जयस्वाल यांनी यावेळी दिले.

आजच्या लोकशाही दिनात तसेच श्रीमती सुरेखा पेठे यांनी गिरगाव येथील पारिजात सदन इमारतीतील रूम नंबर ३५ नियमितीकरणाची दंडात्मक रक्कम आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे माफ करण्याबाबत अर्ज केला. यावेळी श्री. संजीव जयस्वाल यांनी रु. १४,७५० मुद्दल अर्जदाराने भरणे गरजेचे असून त्यावर आकारलेले रु. ६५००० व्याज संपूर्णतः माफ करण्याचा निर्णय घेतला.

अर्जदार श्री. अनिल नाईक यांनी सहकार नगर, चेंबूर येथील इमारत क्रमांक ३८ च्या पुनर्विकासासाठी म्हाडाने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र सुधारित करण्याची तसेच इमारतीला १०० टक्के भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत अर्ज केला. सदर अर्जावर सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनीसंबंधित कार्यकारी अभियंता यांनी सदर इमारतीची पाहणी करावी व सदर प्रकरणाबाबत पाच सदस्यीय समिती गठित करावी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

श्री. संजय बाबरे यांनी माहीम येथील दालमिया कंपाऊंड इमारतीत रुम नं. १५ च्या पात्रता यादीत नाव टाकण्याबाबत अर्ज केला. सदर अर्जावर सुनावणी करताना श्री जयस्वाल यांनी संबंधित कार्यकारी अभियंत्यांना

इमारतीला भेट देऊन पाहणी करावी व पोलिसांनी केलेल्या पंचनाम्याचे तपशील तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

श्रीमती कल्याणी साळवी या उपकरप्राप्त इमारत ३६७ बी, लालू बाई चाळ मधील खोली क्रमांक ३२ मधील भाडेकरू/रहिवासी असून आजच्या लोकशाही दिनात बृहतसूचीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट करून मालकी हक्कावर निवासी सदनिका वितरण करण्याबाबत अर्ज केला. सदर अर्जावर सुनावणी करताना श्री. संजीव जयस्वाल यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी यांनी तात्काळ सुनावणी घेऊन १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

श्रीमती विजया म्हात्रे यांना सन २०२५ च्या बृहतसूचीवरील अर्जदारांसाठी काढण्यात आलेल्या सोडतीत लागलेली सदनिका बदलून देण्याबाबत अर्ज केला. सदर अर्जावर सुनावणी करताना म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी बृहतसूची वरील पात्र अर्जदारांसाठी मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळातर्फे काढण्यात येणाऱ्या पुढील सोडतीमध्ये श्रीमती म्हात्रे यांचा समावेश करून त्यांना नवीन सदनिका देण्याबाबत निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

श्रीमती कविता खडपे गिरगाव येथील श्रॉफ बिल्डिंगमधील भाडेकरू/ रहिवासी असून सदर उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकास केला जाणार आहे. पुनर्विकासासाठी नेमलेल्या विकासकाच्या PAAA च्या प्रारूप मसुद्याला मान्यता देण्याबाबत अर्ज केला. म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी यापूर्वी सुनावणी घेऊन दिलेल्या निकालाप्रमाणे कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांनी करण्याबाबतचे निर्देश दिले.

श्रीमती सुगंधा येरम यांच्या पतीच्या नावे कन्नमवार नगर, विक्रोळी येथील नंदनवन या गृहनिर्माण संस्थेमध्ये संक्रमण गाळा आहे. श्री. येरम यांचे निधन झाले असून सदर संक्रमण गाळ्यामध्ये घुसखोरी केलेल्यांना बाहेर काढण्याबाबत अर्ज श्रीमती सुगंधा येरम यांनी आज लोकशाही दिनात केला. सदर अर्जावर सुनावणी करताना मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी यांच्या स्तरावर सुनावणी घेऊन मानवतेच्या दृष्टिकोनातून सकारात्मक निर्णय करण्याचे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले.

श्री. नितीन दरेकर यांनी कोपरी पवई येथील इमारत क्रमांक २५ मधील मालमत्ता कर, इमारत देखभाल व सोसायटी नोंदणी संदर्भात आजच्या लोकशाही दिनात अर्ज केला होता. सदर अर्जावर सुनावणी करताना म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चार सदसीय समितीने अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

आज झालेल्या लोकशाही दिनात मुंबई मंडळाशी संबंधित ३, कोकण मंडळाशी संबंधित २ व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाशी संबंधित ८ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\2026\22 १६ व्या म्हाडा लोकशाही दिनात १३ अर्जांवर सुनावणी.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra
East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

Outward No. : 22/3163225 Dt. 13 April 2026

## Press Release

### Hearing Conducted on 13 Applications at MHADA's 16th Lokshahi Din

Mumbai, April 13, 2026: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) organized its 16th Lokshahi Din today at Grihanirman Bhavan, Bandra (East). The session was chaired by MHADA Vice President and Chief Executive Officer Shri Sanjeev Jaiswal (IAS). A total of 13 applications submitted by citizens were heard during the program.

Several cases were accorded priority and resolved during the Lokshahi Din. In one such case, the mother of applicant Ms. Ashlesha Ambekar, late Smt. Sunila Ambekar, had been declared a successful applicant in Code No. 1 of the Apollo Mill Scheme under the Mill Workers' Lottery. However, during the document verification and on the basis of letter received from the Apollo Mill, the applicant was declared ineligible. Upon appeal, the Deputy Commissioner, Labour Department, declared her eligible on February 2, 2026. Subsequently, Smt. Sunila Ambekar passed away. As her eligibility had been established, an application was submitted seeking transfer of possession of the tenement to her daughter as the legal heir. During the hearing, Shri Sanjeev Jaiswal directed the concerned officials to hand over possession of the tenement to Ms. Ashlesha Ambekar immediately based on the submitted legal heir certificate. The possession letter will be issued on Wednesday, April 15, 2026.

In another case, Shri Ramkrishna Patade, a successful applicant in the Virar-Bolinj Housing Scheme under the Konkan Board's 2024 lottery, faced a delay in payment due to late sanction of a bank loan. Consequently, interest amounting to ₹1,83,000/- was levied as per rules. Upon his request for waiver, Shri Jaiswal directed the concerned officials to waive the interest, treating it as a special case on humanitarian grounds. He further instructed that similar cases in the scheme be dealt with uniformly to ensure fairness.

Similarly, Smt. Surekha Pethe requested waiver of the penal charges imposed for regularization of Room No. 35 in Parijat Sadan, Girgaon, citing financial constraints. It was decided that while the principal amount of ₹14,750 must be paid, the entire interest amount of ₹65,000 would be waived.

Shri Anil Naik sought revision of the No Objection Certificate issued by MHADA for the redevelopment of Building No. 38 at Sahakar Nagar, Chembur, along with grant of 100% Occupation Certificate. Shri Jaiswal directed the concerned Executive Engineer to inspect the building and constitute a five-member committee to submit a report.

Shri Sanjay Babre requested inclusion of his name in the eligibility list for Room No. 15 in Dalmia Compound, Mahim. The Executive Engineer was directed to conduct a site inspection and verify police panchnama records before submitting a report.

Smt. Kalyani Salvi, a tenant/resident of Room No. 32 in Building No. 367-B, Lalubai Chawl, applied for inclusion of her name in the master list for allotment of a residential tenement on ownership basis. The concerned authority was directed to conduct a hearing and submit a report within 15 days.

Smt. Vijaya Mhatre requested change of the tenement allotted to her in the 2025 lottery for applicants in the master list. It was directed that she be included in the next lottery conducted by the Mumbai Building Repairs and Reconstruction Board and be allotted a new tenement.

Smt. Kavita Khadpe, a tenant/resident of Shroff Building, Girgaon, applied for approval of the draft PAAA submitted by the appointed developer for redevelopment of the cess building. It was directed that further action be taken in accordance with the earlier order passed by the competent authority.

Smt. Sugandha Yeram requested eviction of encroachers from a transit tenement in Nandanvan Housing Society, Kannamwar Nagar, Vikhroli, which was in her late husband's name. The concerned authority was directed to conduct a hearing at the appropriate level and take a humane and considered decision.

Shri Nitin Darekar raised issues related to property tax, building maintenance, and society registration concerning Building No. 25 at Kopri-Powai. It was directed that a four-member committee, under the chairmanship of the Deputy Chief Executive Officer, examine the matter and submit a report.

During today's Lokshahi Din, a total of 3 applications related to the Mumbai Board, 2 to the Konkan Board, and 8 to the Mumbai Building Repairs and Reconstruction Board were heard.

###

(Sd/-)

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer / MHADA




म्हाडा
MHADA
अर्जदार

